अहमदनगर जिल्हयातील अनुशेषांतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्र दुरुस्तीच्या कामाचे प्रलंबित देयके अदा करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय, क्रमांकः संकिर्ण २०१७/प्र.क्र.२०२/आरोग्य-३

१० वा मजला, संकुल इमारत,
गो.ते.रुग्णालय, मुंबई-४०० ००१.
तारीख: ११ ऑक्टोंबर, २०१७.

वाचा -

१) शासन निर्णय, वित्त विभाग,क्रमांक विअप्र-२०१३/ प्र.क्र.३०/२०१३/विनियम, भाग-२, दि.१७.०४.२०१५ वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८, भाग- पहिला,

२) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक संकीर्ण-१०.१५/प्र.क्र.१८/अर्थोपाय दि. २१ सप्टेंबर, २०१७

३) आरोग्य सेवा संचालनालय, मुबई यांचे पत्र क्रमांक, संआसे/ कक्ष-७अ/टे-७/अखर्चित निधी/७०४६-४७/२०१७ दि. ०१.०९.२०१७

प्रस्तावना -

सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात अहमदनगर जिल्हयातील प्रादेशिक अनुशेषांतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्र दुरुस्तीच्या कामासाठी शासन निर्णय दि. ३१ मार्च, २०१५ अन्वये रु. २५७.३७ लक्ष अनुदान वितरीत करण्यात आले होते. सदर कामासाठी रु. २४६.०१ लक्ष एवढया रकमेची प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. त्यापैकी रु. १७७.२६ लक्ष इतका निधी खर्च झाला. तथापि सदर कामाची ई निविदा काढण्यास उशीर झाल्यामुळे तसेच पाणी टंचाईमुळे व प्रत्यक्ष कार्यरंभ आदेश उशीरा प्राप्त झाल्यामुळे रु. ६२.७१ लक्ष इतका निधी खर्च होऊ शकला नाही. सदर काम भौतिकदृष्टया पूर्ण झाले असून रु. ९६.६२ लक्ष रु.६२.७१ लक्ष रकमेची प्रलंबित देयके अदा करण्यास मंजुरी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय -

उपरोक्त संदर्भाधीन शासन निर्णय क्रमांक १ व २ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय शक्तीचा वापर करून आणि त्यामध्ये अंतर्भूत असलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहून भौतिकदृष्टया पूर्ण झालेले अहमदनगर जिल्हयातील प्रादेशिक अनुशेषांतर्गत खालील प्राथमिक आरोग्य केंद्र व

उपकेंद्र दुरुस्तीच्या कामाचे रु.६२.७१ लक्ष - (अक्षरी रु.बासष्ट लक्ष ऐकाहत्तर हजार फक्त) रकमेचे देयक अदा करण्यास खालील प्रमाणे मान्यता देण्यात येत आहे.

रु. लाखात

अ.क्र.	कामाचे नाव	प्रशासकीय मान्यतेदची रक्कम	प्रलंबित देयकाची रक्कम
१	उपकेंद्र कानोशी ता. शेवगाव	३.००	२.२६
२	उपकेंद्र हिरडगाव ता. श्रीगोंदा	३००.	२.९५
३	उपकेंद्र म्हातारपिंप्री, ता. श्रीगोंदा	३००.	२.९४
४	उपकेंद्र आखेगा ता. शेवगाव	३००.	२.९३
५	उपकेंद्र ढोरजळगाव ता. शेवगाव	३००.	२.९२
६	उपकेंद्र आखातवाडे ता.शेवगाव	३००.	२.९३
७	उपकेंद्र वडूले बु. ता. शेवगाव	३००.	२.९२
८	उपकेंद्र परीटवाडी ता. कर्जत	३००.	२.९५
९	उपकेंद्र बाभुळगाव ता. कर्जत	३००.	२.९५
१०	उपकेंद्र हिरडगांव ता. श्रीगोंदा	२.५९	२.५५
११	उपकेंद्र वाळुंज ता.अहमदनगर	३.००	२.९६
१२	उपकेंद्र सांडवे ता. अहमदनगर	३००.	२.९४
१३	उपकेंद्र डोंगरगण ता.अहमदनगर	३००.	२.९८
१४	उपकेंद्र हिवरे बाजार ता. अहमदनगर	३००.	२.९८
१५	उपकेंद्र गुंडेगाव ता. अहमदनगर	३००.	२.९५
१६	प्रा.आ.केंद्र भातकुडगाव ता. शेवगाव	१.६२	१.६०
१७	उपकेंद्र सावरगाव पाट ता. अकोले	३००.	३.००
१८	उपकेंद्र वणेगाव ता. संगमनेर	३००.	३.००
१९	उपकेंद्र पोखरी बा. ता. संगमनेर	३००.	३.००
२०	उपकेंद्र चौरेकौटे ता. संगमनेर	३००.	३.००
२१	उपकेंद्र देडगाव ता. नेवासा	३००.	३.००
२२	उपकेंद्र गळनिंब ता. नेवासा	३००.	३.००
	एकूण	**६४.२१**	**६२.७१**

२. सदर देयकावरील खर्च शिल्लक अनुदानातून मागणी क्रमांक- आर-१, मुख्यलेखाशिर्ष "२२१०- वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य, ०६- सार्वजनिक आरोग्य, ८००- इतर खर्च, प्रादेशिक असमतोल दूर करण्याकरीता योजना- स्थानिक क्षेत्रातील योजना (राज्य योजना), (०१)(०७) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ याच्या कलम १८७ अन्वये योजनांतर्गत योजनाकरिता अनुदान (२२१० ३०६५), ३१ सहायक अनुदान (वेतनेतर) या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

३. जी कामे भौतिकदृष्टया पूर्ण झाली आहेत व खर्चाच्या परवानगी अभावी देयकाचे प्रदान होऊ शकत नाही. अशा सर्व प्रकरणी ३१ डिसेंबर, २०१७ पर्यंत देयकाचे प्रदान करण्यात यावे. मात्र ३१ डिसेंबर,२०१७ नंतर अशा देयकाचे प्रदान केल्यास ही बाब वित्तिय अनियमितता म्हणून समजण्यात येईल. तसेच ३१ मार्च, २०१६ पर्यंतचा सर्व अखर्चित निधी दिनांक ३१ डिसेंबर, २०१७ नंतर शासन खाती जमा करण्याची जबाबदारी संबंधित प्रशासकीय प्रमुखांची राहील.

४. सदर शासन निर्णय, वित्त विभाग,क्रमांक विअप्र-२०१३/ प्र.क्र.३०/२०१३/विनियम, भाग-२, दि.१७.०४.२०१५ वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८, भाग- पहिला, उपविभाग - एक, अ.क्र.६, नियम क्रमांक - ४० अन्वये प्रशासकीय विभागाला प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय अधिकारानुसार त्यात नमूद अटींच्या अधिन राहून व शासन निर्णय वित्त विभाग संकीर्ण-१०.१५/प्र.क्र.१८ अर्थोपाय दि. २१ सप्टेंबर, २०१७ मधील ३.१, ३.२ व ३.३ येथील नमूद अटीच्या अधिन राहुन शासन निर्णय निर्गमीत करण्यात येत आहे. ,

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१०१११६३९३७९४१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Roshani Dinesh Kadam Patil

Digitally signed by Roshani Dinesh Kadam Patil
DN: CN = Roshani Dinesh Kadam Patil, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Public Health Department
Date: 2017.10.11 16:10:41 +05'30'

(रो.दि कदम पाटील)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महालेखापाल, महाराष्ट्र- १/ २ (लेखा परिक्षा / लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/ नागपूर.
२. संचालक, आरोग्य सेवा, मुंबई.
३. सह संचालक, आरोग्य सेवा (रुग्णालये), मुंबई.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर
५. जिल्हा कोषागार अधिकारी, अहमदनगर
६. जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर
७. निवडनस्ती (आरोग्य-३).